CELEBRATING 75TH INDEPENDENCE DAY IN BHARATI VIDYAPEETH PREMISES KHARGHAR

लोकमत

# नवी मुंबईमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## सुरक्षा नियमांचे पालन : सरकारी कार्यालये, शाळा, महाविद्यालयांत दिली मानवंदना

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** नवी मुंबई शहरात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील महापालिका मुख्यालय, सिडको, कोकण भवन, शाळा, महाविद्यालये, सोसायट्या, विविध संस्थांची आणि राजकीय पक्षांची कार्यालये येथे झेंडावंदनाचे कार्यक्रम झाले. कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने, कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचे पालन करण्यात आले होते.

अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयासमोरील प्रांगणात आयुक्त अभिजीत बांगर यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे आणि इतर विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, पोलीस, अग्निशमन दलाचे जवान व नागरिक सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत उपस्थित होते. कोकण भवन येथे विभागीय महसूल आयुक्त विलास पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. या समारंभास नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.



स्वातंत्र्य दिनानिमित्त खारघरमधील भारती विद्यापीठातील कर्मचाऱ्यांनी ७५ असा आकडा करून मानवंदना दिली.

सामाजिक अंतर संदर्भातील सर्व नियमांचे पालन करण्यात आले होते. सर्व उपस्थितांनी राष्ट्रीय पोशाखासह मास्क परिधान केले होते. यावेळी नवी मुंबई पोलीस पथकाने राष्ट्रध्वजाला

महसूल विभागाचे उपायुक्त मकरंद देशमुख, सामान्य विभागाचे उपायुक्त मनोज रानडे, विकास विभागाचे उपायुक्त गिरीश भालेराव, तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्ती, वरिष्ठ

कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. यावेळी सोशल डिस्टन्सिंगसह सॅनिटायझरचा वापर करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निंबाजी गीते यांनी केले. कोरोनाच्या

महाविद्यालये अद्याप बंद आहेत. त्यामुळे शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिन साजरा केला, तसेच सोसायट्यांमध्येही नियमांचे पालन

### पालिका मुख्यालय इमारतीस रोषणाई

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या मुख्यालयास आकर्षक रोषणाई करण्यात आली असून, उद्यापर्यंत महापालिका मुख्यालय तिरंगी रंगात झळाळणार आहे.

### स्वातंत्र्य दिनानिमित्त वृक्षारोपण

पुणे विद्यार्थी गृहच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ यांच्या उपस्थितीत कोविड योद्धे डॉ.अशोक जाधव यांच्या हस्ते स्वातंत्र्य दिनी झेंडावंदन झाले. कार्यक्रमानंतर मान्यवर व मुख्याध्यापकांच्या हस्ते शालेय मैदानात वृक्षारोपण करण्यात आले.

Hello Navi Mumbai
Page No. 1 Aug 16, 2021
Powered by: erelego.com

# अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन उत्साहात



नवी मुंबई : पालिका मुख्यालयात ध्वजवंदन करण्यात आले.

वाशी, ता. १५ (बातमीदार) : अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन नवी मुंबईत उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेपासून वरुण राजाने हजेरी लावल्याने संततधारेतच अनेक ठिकाणी ध्वजवंदन करण्यात आले. कोकणभवन येथे विभागीय महसूल आयुक्त विलास पाटील यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. समारंभास नवी मुंबई पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंह, नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख आदी उपस्थित होते. कोरोना विषाणूची पार्श्वभूमी लक्षात ठेवून सामाजिक अंतर संदर्भातील सर्व नियमांचे पालन करण्यात आले होते. या वेळी नवी मुंबई पोलिस पथक यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. आयकॉनिक वास्तू म्हणून ओळख असलेल्या महापालिकेच्या मुख्यालयास आकर्षक रोषणाई करण्यात आली असून सोमवार १६ ऑगस्टपर्यंत तिरंगी रंगात पालिका झळाळणार आहे. पालिका क्षेत्रातील दिघा, ऐरोली, घणसोली, कोपरखैरणे, तुर्भे, वाशी, बेलापूर विभाग कार्यालयांत ध्वजवंदन करण्यात आले.



पनवेल : खारघरमधील अनियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार केली.

## हुतात्मा स्मारकात कार्यक्रम

पनवेल (प्रतिनिधी) : महापालिकेच्या हुतात्मा स्मारक उद्यानात स्वातंत्र्य सैनिक बबन धारणे यांच्या पत्नी ताराबाई धारणे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या वेळी हुतात्म्यांचा त्याग कधीही विसरता येणार नसल्याचे विचार आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले. तर वळवली, व टेंभोडे गावातील अंगणवाडी सेविका, आशा नर्स यांना सामाजिक संस्थेच्या वतीने गौरविण्यात आले.

## पनवेल महापालिकेत स्वातंत्र्यदिन साजरा

पनवेल (प्रतिनिधी) : पंच्याहत्तराव्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पनवेल महापालिकेत महापौर डॉ. कविता किशोर चौतमाल हस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपमहापौर जगदीश गायकवाड, आयुक्त गणेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी रायगड सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा बल यांच्यावतीने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक, नगरसेविका, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, साहाय्यक आयुक्त चंद्रशेखर खामकर, साहाय्यक आयुक्त धैर्यशील जाधव आदी उपस्थित होते. अमृत महोत्सवी स्वातंत्र्यदिनानिमित्त शिक्षण विभागाच्यावतीने प्रश्नमंजूषा, देशभक्तीपर गीत, काव्यवाचन, निबंध स्पर्धांचे ऑनलाइन आयोजन करण्यात आले होते.

(आणखी वृत्त/ ३)



APPERIATED BT TIMES OF INDIA

9:02 4G

timesofindia.com




Indo-Tibetan Border Police jawans celebrate Independence Day at the banks of Pangong Tso in Ladakh - ANI




Celebrating freedom at Bharati Vidyapeeth college Kharghar in Navi Mumbai - TNN

